# प्रेस नोट

**कोरेगाव पार्क भागात बेशिस्तपणे वाहने उभी करणारे वाहन चालक व ध्वनी प्रदूषण कायदयाचे उल्लंघन करणारे हॉटेल चालकांविरूद्ध कारवाई**

हॉटेल संदर्भात नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत असून, त्यामध्ये विशेषतः कोरेगाव पार्क भागातील नागरिकांच्या हॉटेल मालक/चालक यांचे विरूद्ध लेखी स्वरूपात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. हॉटेल चालक/मालक हे पार्किंग भागात बार चालवतात. रात्री १०.०० वा. नंतर स्पिकर चालू असतात, वाहने रोडवर पार्किंग केले जातात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. रात्रौ ०१.३० वा. नंतर हॉटेल चालू असतात. स्थानिक रहिवाशांना त्यांचा त्रास होतो. विशेषतः कोरेगाव पार्क भागातील लेन नं.५,६,७ या लेनमधील रोडवर वाहन चालक बेशिस्तपणे वाहने उभी करतात. नमूद भागातील हॉटेल चालकाविरूद्ध स्थानिक नागरिक व सोसायटीमधील नागरिकांच्या जास्त तक्रारी आहेत.

हॉटेलची स्वतंत्र पार्किंग व्यवस्था पाहिजे. ग्राहक रस्त्याचे दुतर्फा व फूटपाथवर वाहने पार्क करतात. तसेच व्हॅलेट पार्किंग चालक हे रस्त्यावर ज्या ठिकाणी जागा असते, त्या ठिकाणी वाहने पार्क करतात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे मा.श्री.बच्चन सिंह सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.श्रीमती जयश्री गायकवाड सो., सहा.पो.आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे यांनी नमूद तक्रारीच्या अनुषंगाने कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी व कोरेगाव पार्क वाहतूक शाखेकडील अधिकारी व कर्मचारी अशी संयुक्तिक मोहिम राबवून कोरेगाव पार्क लेन नं.५,६,७ मध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे व बेशिस्तपणे रस्त्याचे दुतर्फा वाहने उभी करणारे वाहन चालकांविरूद्ध दि.१९/०९/२०१८ रोजीपासून कारवाई सुरू केली असून ९६ वाहन चालकांविरूद्ध कारवाई करून त्यांचेकडून १९,२००/- रू. दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच २५ वाहन चालकांनी वाहतूकीस अडथळा होवून कोंडी होईल, अशा रीतीने वाहन पार्क केल्याने त्यांचेविरूद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १०२/११७ प्रमाणे २५ खटले दाखल केलेले आहेत. तसेच ध्वनी प्रदूषण कायदयाचे उल्लंघन करणारे कोरेगाव पार्क, लेन नं.७ मधील डेली ऑल डे डायनिंग अँड बार व ईफिंगुट हॉटेल यांचेविरूद्ध ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) २००० अधिनियमान्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच ज्या हॉटेल चालकांनी पार्किंगमध्ये शेड मारून हॉटेल व्यवसाय सुरु केलेला आहे, त्या हॉटेलांविरूद्ध कारवाई करणेबाबत पुणे महानगरपालिका अतिक्रमण विभाग यांचेशी संपर्क साधून साऊथ मेन रोड, ग्रँड मामाज व लेन नं.७ मधील बार स्टॉक एक्सचेंज या ठिकाणी पुणे मनपा यांनी पार्किंगमधील व टेरेसवरील अतिक्रमण काढून टाकण्यात आलेले आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे, बेशिस्त व दुतर्फा पार्किंग करणारे, वाहतुकीस अडथळा आणणारे वाहन चालकांविरूद्ध व ध्वनी प्रदूषण कायदयाचे उल्लंघन करणारे हॉटेल चालक/मालक यांचेविरूद्ध यापुढेही अशीच कारवाई चालू राहणार आहे.

.09.18